महाराष्ट्र शासनाचा २००९-२०१० या वर्षाचा अतिरिक्त
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील

यांनी गुरुवार, दिनांक ४ जून २००९ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

अर्थसंकल्पीय स्थिती.

१. मार्च, २००९ मध्ये अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना २५२.१७ कोटी रुपये शिल्लक राहतील असा अंदाज व्यक्त केला होता. अंतरिम अर्थसंकल्प मांडताना मी योजनेचे आकारमान २६ हजार कोटी रुपये राहील असे नमूद केले होते. आता अतिरिक्त अर्थसंकल्प सभागृहात सादर करताना योजनेच्या आकारमानात ११,९१५ कोटी रुपये इतक्या रकमेची वाढ केली आहे. त्यामुळे आता सन २००९-१० ची योजना ३७,९१५ कोटी रुपये इतक्या रकमेची झाली आहे. अतिरिक्त अर्थसंकल्पात योजनांतर्गत खर्चाकरीता ११,९१५ कोटी रुपये व योजनेतर खर्चा करिता रुपये १०.८३ कोटी रुपये असे एकूण ११,९२५.८३ कोटी रुपये इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

जमा रकमांमध्ये मी मुख्यत्वे केंद्र शासनाकडून मिळणारी अनुदाने, करेतर महसूल व अतिरिक्त खुल्या बाजारातील कर्ज या विविध माध्यमातून मिळणा-या १०,६५० कोटी रुपये इतक्या रकमा विचारात घेतल्या आहेत. अतिरिक्त अर्थसंकल्पातील जमा रकमा व खर्चातील वाढीमुळे मार्च, २००९ च्या अंतरिम अर्थसंकल्पातील २५२.१७ कोटी रुपये इतक्या रकमेचे अधिक्य अतिरिक्त अर्थसंकल्पात १,०२३.६६ कोटी रुपये इतक्या अर्थसंकल्पीय तुटीत परिवर्तीत होईल. त्यापैकी, अतिरिक्त अर्थबळ उभारणीच्या माध्यमातून ९१० कोटी रुपये उभारण्यात येतील. सन २००९-१० मधील महसूली तूट ७१२३.३८ कोटी रुपये इतकी राहील.

विक्रीकर महसूलाचा आढावा.

२. दिनांक १ एप्रिल २००५ पासून मूल्यवर्धित कर प्रणाली राज्यात लागू झाली व आता जवळपास स्थिरावली आहे.

मागील आर्थिक वर्षात जागतिक मंदीचे सावट संपूर्ण देशावर होते. तरी देखील वर्षात राज्याला विक्रीकराच्या स्थूल महसूलापोटी ३३ हजार ९५४ कोटी रुपये प्राप्त झाले असून हा महसूल राज्याच्या २००७-०८ च्या तुलनेत

९.२८ टक्के जास्त आहे. याच काळात आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्यामुळे आणि पेट्रोल व डिझेलवरील कराचा दर कमी झाल्यामुळे राज्याच्या विक्रीकराच्या महसुली उत्पन्नात अंदाजे ५८६ कोटी रुपये रकमेची घट झाली. या पार्श्वभूमीवर राज्याने विक्रीकराचे लक्ष्यांक ओलांडले ही समाधानाची बाब आहे.

वस्तू व सेवाकर कायद्याची अंमलबजावणी.

३. मागील वर्षाच्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मा. वित्तमंत्र्यांनी १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशामध्ये वस्तू व सेवाकराच्या (GST) अंमलबजावणीचा पुनरुच्चार केला. देशाच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीच्या सुधारणेमध्ये ही एक ऐतिहासीक बाब ठरणार आहे. वस्तू व सेवाकराच्या अंमलबजावणीमुळे सध्या अस्तित्वात असलेल्या अनेक करांऐवजी एक समान कर लागू होईल. यामुळे करप्रणालीमध्ये सुसूत्रता येऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या शक्तिप्रदत्त समितीमध्ये या कर प्रणाली संदर्भात सतत चर्चा व विचारविनिमय सुरु आहे. राज्यात मूल्यवर्धित करप्रणालीची सुरुवात करण्यापूर्वी व्यापारी, व्यापारी संघटना व कर सल्लागारांना विश्वासात घेतले होते. त्याप्रमाणे वस्तू व सेवाकर कायदा अंमलात आणण्यापूर्वी सुध्दा सर्व संबंधितांना विश्वासात घेतले जाईल.

विक्रीकर विभागाचे संगणकीकरण व ई-रिटर्न सेवेमध्ये राज्याची आघाडी.

४. सध्या विक्रीकर विभागाचे संगणकीकरण वेगाने सुरु आहे. आंतरराज्यीय खरेदी व्यवहारांसाठी सी-फॉर्म सारखे नमुने ऑन लाईनद्वारे पुरविण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. विभागातर्फे लवकरच ई-रजिस्ट्रेशन, ई-पेमेंट या सारख्या सुविधा व्यापाऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. विक्रीकर विभागाने व्यापाऱ्यांची विवरणपत्रके इलेक्ट्रॉनिक स्वरुपात इंटरनेटव्दारे घेण्यास मागील एक वर्षापासून टप्प्याटप्प्याने सुरुवात केली आहे. त्यास भरघोस प्रतिसाद मिळून मे, २००९ अखेरीस ४ लाख २७ हजार ७९८ व्यापाऱ्यांनी इंटरनेटद्वारे विवरण पत्रके दाखल

केली आहेत. सन्माननीय सदस्यांना सांगण्यास मला आनंद होत आहे की, सर्व व्यापाऱ्यांची करविषयक विवरण पत्रके मोठया प्रमाणात इलेक्ट्रॉनिक स्वरुपात घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. यासाठी राज्यातील व्यापारी, विविध व्यापारी संघटना व कर सल्लागारांचे महत्वपूर्ण योगदान लाभले असून ते सर्व अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी दिलेल्या उत्कृष्ट सहकार्याच्या पार्श्वभूमीवर मी असे जाहीर करतो की, जे व्यापारी विक्रीकराच्या संकेतस्थळावर ई सेवेकरीता दिनांक ३१ जुलै २००९ पर्यंत नोंदणी करुन, १ एप्रिल २००५ पासून दिनांक ३० जून २००९ या कालावधी पर्यंतची विवरणपत्रके इलेक्ट्रॉनिक स्वरुपात संपूर्ण करभरणा करुन भरतील, अशा व्यापाऱ्यांना उशीरा विवरणपत्रके भरण्याबद्दल शास्ती आकारली जाणार नाही. परंतु ज्या प्रकरणात याप्रकारच्या शास्तीचा भरणा झाला असेल अशा प्रकरणांना हा निर्णय लागू होणार नाही.

**त्वरित परतावा देण्यासाठी सुलभ परतावा योजना.**

५. मूल्यवर्धित कर कायद्याच्या स्वरुपामुळे विक्रीकर परतावा घेणा-या व्यापाऱ्यांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. विक्रीकराचा परतावा देण्यासाठी प्रचलित पध्दतीनुसार अनेक व्यापाऱ्यांना परतावा मिळण्यास विलंब होतो. यासाठी ज्या व्यापाऱ्याचा कर परतावा ५ लक्ष रुपये अथवा त्याहून कमी रकमेचा आहे अशा व्यापा-यांकरीता ऐच्छिक योजनेसारखी एक नवीन ‘ सुलभ परतावा योजना ’ जाहीर करण्यात येत आहे. या योजनेमुळे कमी परतावा असणा-या व्यापाऱ्यांचा फायदा होवून त्यांना कर परतावा त्वरित मिळेल.

**मोटारवाहन परवाना-धारकांकरिता व्यवसायकराची अभय योजना.**

६. मोटारवाहन परवानाधारकांकडे व्यवसायकराची बरीच वसूली प्रलंबित आहे. या परवानाधारकांना थकीत व्यवसाय कर भरण्याची एक शेवटची संधी देण्याकरिता दिनांक १ जुलै २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या काळात एक अभय योजना राबविण्यात येईल. या अभय योजनेची व्याप्ती ठरविणारा शासन निर्णय लवकरच प्रसृत करण्यात येईल.

व्यवसायकर कायद्यातील सवलती.

७. व्यवसायकर कायद्याच्या तरतुदीनुसार ज्या वेतनधारकाचे मासिक वेतन २ हजार ५०० रुपयांपेक्षा अधिक आहे त्या वेतनधारकाला व्यवसायकर भरणे अनिवार्य आहे. सदर रकमेची मर्यादा ही फार कमी असून त्यामध्ये वाढ करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा मागणी केली आहे. या मागणीचा साकल्याने विचार करुन मी आता असे जाहीर करतो की, ५ हजार रुपये अथवा त्यापेक्षा कमी मासिक वेतन असणा-या वेतनधारकाला व्यवसाय कर भरावा लागणार नाही. ५ हजार रुपयांपेक्षा अधिक मासिक वेतन असणाऱ्या वेतनधारकाला विद्यमान दराप्रमाणे व्यवसायकर लागू राहील.

व्यवसायकर कायद्याच्या तरतुदीनुसार स्वयंव्यवसाय करणा-या व्यावसायिकांना नावनोंदणी प्रमाणपत्र घेणे अनिवार्य असते. व्यवसाय कर भरण्यासाठी पात्र असूनदेखील जो व्यावसायिक नोंदणी घेत नाही त्याला त्या संपूर्ण कालावधीसाठी कर, व्याज व शास्ती भरावी लागते. याबाबत मी आता असा निर्णय घेतला आहे की, व्यवसायकर कायद्यातील नियमांमध्ये बदल करुन नावनोंदणी दाखला घेण्याच्या वर्षापासून मागील फक्त ५ वर्षांच्या कालावधीचा देय व्यवसायकर व त्यावरील व्याजाचा भरणा करणे आवश्यक राहील. त्यापूर्वीच्या काळातील कराची मागणी केली जाणार नाही. ही सूट ३१ मार्च २०१० पर्यंतच लागू राहील.

दुकाने आणि आस्थापना अधिनियमाखाली येणाऱ्या नाव नोंदणी धारकांचा व्यवसायकर कामगार विभाग/स्थानिक प्राधिकरणे यांच्यामार्फत वसूल केला जाईल. करदात्यांसाठी ही ‘ एक खिडकी योजना ’ निश्चितच सोयीची राहील.

विवरणपत्रके न भरल्यास किंवा उशीरा भरल्यास लागणारी शास्तीची रक्कम कमी करणेबाबत.

८. मूल्यवर्धितकर कायद्याखाली व्यापा-यांनी जर विवरणपत्रक दाखल केले नाही किंवा उशीरा दाखल केले तर त्याकरीता प्रत्येक विवरणपत्रकाच्या कसुरीबाबत १० हजार रुपये एवढया शास्तीची तरतूद आहे. ही रक्कम लहान व्यापा-यांकरीता जास्त होते व ती कमी करण्यात यावी अशी अनेक करदात्यांकडून मागणी करण्यात आलेली आहे. सदर मागणीचा विचार करुन शास्तीची रक्कम १० हजार रुपयांवरुन ५ हजार रुपये एवढी कमी करण्यात येईल. हा शास्ती आदेश लावतांना अधिका-यांना कोणताही स्वेच्छाधिकार रहाणार नाही. अशा शास्ती आदेशाविरुध्द आता अपिल करता येणार नाही.

सुधारीत विवरणपत्रके व सूचना पत्र.

९. कायद्यातील सध्याच्या तरतुदीनुसार सुधारीत विवरणपत्रके भरण्याच्या पध्दतीमध्ये सुसूत्रता आणणे आवश्यक आहे. याबाबत सुधारीत विवरणपत्रक भरण्याच्या नियमामध्ये योग्य ते बदल प्रस्तावित आहेत. त्याचबरोबर मूल्यवर्धितकर कायद्यातील लेखापरीक्षण कार्यवाही दरम्यान व्यापा-यास लिखित सूचनापत्र देण्याबाबत तरतूद करण्यात येत आहे.

मूल्यवर्धित कायद्यातील सुधारणा

१०. मूल्यवर्धित कर प्रणालीमध्ये व्यापाऱ्यांनी अचूक विवरणपत्रक भरुन त्यानुसार संपूर्ण कर भरणे अपेक्षित आहे. करचुकवेगिरी करणा-या व्यापाऱ्यास त्याने चुकविलेल्या कराच्या रकमेएवढी शास्ती लागू शकते. मात्र, विभागाने केलेल्या व्यवसाय लेखापरिक्षणानंतर जर व्यापा-यांनी विवरणपत्रकामध्ये दाखविलेल्या करापेक्षा अधिक करदायित्व येत असल्याचे आढळून आल्यास व याबाबत विभागाने दिलेल्या सूचनापत्रानुसार अतिरिक्त करभरणा केल्यास अशा अतिरिक्त करासाठी १०० टक्के शास्ती न लावता २५ टक्के इतक्या रकमेएवढे अतिरिक्त व्याज आकारण्याचे प्रस्तावित आहे.

लिव्ह लायसन्सच्या करारासंबंधी सक्षम अधिकाऱ्यांची संख्या वाढविणेबाबत

११. लिव्ह व लायसन्सच्या पध्दतीमुळे शहरी भागात घरांची उपलब्धता वाढली आहे. परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीस होणाऱ्या विलंबामुळे अनेक घरमालक त्यांची घरे रिकामी ठेवतात. याबाबतच्या दाव्यांचा तातडीने निपटारा होण्यासाठी या कायद्याखाली सक्षम अधिकाऱ्यांच्या संख्येमध्ये वाढ करण्यात येईल. शहरी भागातील घरांची समस्या सोडविण्याबाबत हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

उद्योगविषयक सर्व कायद्यांचा व कार्यपध्दतीचा आढावा घेण्यासाठी समितीची स्थापना.

१२. कोणत्याही कायद्याची व कार्यपध्दतीची अंमलबजावणी ही उद्योगाला पूरक असणे गरजेचे आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे व तंत्रज्ञानामुळे या कायद्यांमध्ये व कार्यपध्दतीमध्ये योग्य ते बदल वेळीच केले नाही तर त्या गोष्टी उद्योगास जाचक ठरु शकतात. याबाबत आता असा निर्णय घेण्यात येत आहे की, उद्योग व व्यापाराशी संबंधित महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणा-या सर्व कायद्यांची व विविध विभागातील कार्यपध्दतीची योग्य समिक्षा करण्यात येईल. याकरिता तज्ञांचा सहभाग असलेली एक समिती स्थापना करण्यात येईल. ही समिती आपला अहवाल शासनास सहा महिन्यात सादर करेल.

कर विषयक प्रस्ताव

१३. अध्यक्ष महोदय, मी आता माझे कर विषयक प्रस्ताव सभागृहापुढे सादर करीत आहे.

अवकाश तंत्रज्ञानासाठी आवश्यक वस्तूंवर करसवलत.

१४. अवकाश तंत्रज्ञानामध्ये देशाने बरीच प्रगती केली असून भारताने उपग्रह व प्रक्षेपण प्रणालीमध्ये अभूतपूर्व यश संपादन केले आहे. उपग्रह क्षेपणास्त्र प्रणालीमध्ये वापरल्या जाणा-या प्रेशर व्हेसल, रीॲक्टर, केमिकल स्टोअरेज टँक वरील मूल्यवर्धित कराचा दर १२.५ टक्क्यां वरुन ४ टक्के करण्याचा मी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) सारख्या संस्थेस या करकपातीचा फायदा होईल.

कापूस जिनिंग व प्रेसिंग यंत्रसामुग्रीच्या करात सवलत.

१५. कापूस जिनिंगचा उद्योग विदर्भ व मराठवाडयात मोठया प्रमाणावर आहे. कापसाच्या जिनिंग व प्रेसिंगसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीवरील कराचा दर राज्यामध्ये १२.५ टक्के आहे. कॉटन जिनिंग व प्रेसिंगसाठी लागणा-या यंत्रसामुग्रीचा कराचा दर १२.५ टक्के वरुन कमी करुन ४ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे विदर्भ व मराठवाडयातील कापूस जिनिंग आणि प्रेसिंग उद्योगास नवीन चालना मिळेल.

कंपोस्टिंग मशिनवर कर कपात.

१६. जैविक घन कच-यापासून कंपोस्ट खते बनविण्याकरीता कंपोस्टिंग मशिनचा वापर करण्यात येतो. सध्या या यंत्रसामुग्रीवरील कराचा दर १२.५ टक्के एवढा आहे. पर्यावरण हिताच्या दृष्टीने कंपोस्टिंग मशिनचा कराचा दर १२.५ टक्के वरुन ४ टक्के एवढा कमी करण्यात येत आहे.

सौर ऊर्जा साधनांवर कर सवलत.

१७. सौर ऊर्जेवर चालणारी उर्जा साधने व ज्या उपकरणांच्या वापरामुळे विजेची बचत होते अशा वस्तूंच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी या वस्तूंच्या विक्रीवर कर सवलत देण्याचे प्रस्तावित आहे. सोलर पॅनेल, सोलर कुकर, सोलर हिटर, सोलर पंपसेट, सोलर जनरेटिंग सेट, इत्यादी सौर ऊर्जेवर चालणारी साधने करमुक्त करण्यात येतील.

सी.एफ.एल. बल्बवरील कर सवलत.

१८. कॉम्पॅक्ट फ्ल्यूरोसन्ट लँप (सीएफएल) च्या वापराने विजेची बरीच बचत होते. या बल्बचा अधिकाधिक वापर व्हावा या हेतूने या वर असलेला १२.५ टक्के कराचा दर कमी करुन तो ४ टक्के करण्यात येत आहे.

वैद्यकीय उपकरणांवर कर सवलत.

१९. राज्यामध्ये ठराविक वैद्यकीय उपकरणांवरील कराचा दर हा ४ टक्के एवढा ठेवण्यात आला आहे. राज्यातील वैद्यकीय व्यवसाय व उद्योगास प्रोत्साहन देण्याकरीता स्काल्प व्हेन्स, स्टेथोस्कोप, डायलिसिस उपकरणे, इत्यादी वस्तूंवरील कराचा दर १२.५ टक्क्यांवरुन कमी करुन ४ टक्के एवढा करण्यात येईल.

हॉटेल व्यावसायिकांना दिलासा.

२०. मूल्यवर्धित कर कायद्यानुसार तीन व त्यापेक्षा कमी तारांकन असलेल्या उपाहारगृहांना आपसमेळ योजनेखाली कराचा दर ८ टक्के आहे. हा दर जास्त असून छोटया उपाहारगृहांवरील हा कराचा भार कमी करण्याबाबत हॉटेल व्यावासायिकांनी वेळोवेळी शासनास निवेदने दिली आहेत. या निवेदनांचा विचार करुन तीन व त्यापेक्षा कमी असलेल्या हॉटेल व्यावसायिकांसाठी आपसमेळ योजनेनुसार कराचा दर ८ टक्के वरुन कमी करुन ५ टक्के करण्यात येत आहे.

गॅस शेगडीवर कर कपात.

२१. गॅसवर चालणाऱ्या घरगुती वापराच्या शेगडयांवर असलेला १२.५ टक्के विक्रीकर कमी करुन ४ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील गृहिणींना होईल. त्याचबरोबर घरगुती गॅसचा वापर वाढल्याने पर्यावरणाची हानी देखील कमी होईल.

प्लॅस्टिक चटईवरील कर कमी.

२२. महाराष्ट्राच्या काही भागात प्लॅस्टिक चटई तयार करण्याचा उद्योग मोठया प्रमाणावर चालतो. चटईच्या निर्मितीसाठी टाकावू प्लॅस्टिकचा वापर करण्यात येतो. यामुळे पर्यावरण संवर्धनास मदत होवून प्रदूषणास आळा बसतो. या उद्योगाला चालना देण्याकरीता प्लॅस्टिक चटईवर सध्या असलेला विक्रीकराचा दर १२.५ टक्के वरुन कमी करुन ४ टक्के करण्यात येत आहे.

कुटीर उद्योगातील अगरबत्तीसाठी करमाफी.

२३. कुटीर उद्योगामध्ये अगरबत्ती बनविण्याचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो. या उद्योगामुळे अनेक लोकांना रोजगार मिळतो. बाहेरील राज्यातून मोठया प्रमाणात येणा-या मालाबरोबर या उद्योगाला स्पर्धा करावी लागते. या उद्योगला प्रोत्साहन देण्याकरीता अगरबत्ती, धूपकाडी किंवा धूपबत्ती म्हणून सर्वसाधारणपणे ओळखल्या जाणाऱ्या सुगंधी काडया यावर सध्या असलेला ४ टक्के विक्रीकर रद्द करुन या वस्तू करमुक्त करण्यात येत आहे.

शिकेकाई व रिठा करमुक्त.

२४. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शिकेकाई व रिठ्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या वस्तूंवर असलेला विक्रीकराचा दर १२.५ टक्के हा जास्त आहे. याकरीता यावरील विक्रीच्या कराचा दर ४ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

नकली दागिन्यांवरील करात कपात.

२५. नकली दागिने तसेच काचेचे, प्लॅस्टिकचे किंवा मौल्यवान धातूंव्यतिरिक्त इतर धातूंचे मणी यांचा वापर दागिन्यांसाठी केला जातो. या वस्तूंच्या विक्रीवर सध्या ४ टक्के दराने कर आकारणी होते. सोने, चांदी, हिरे व त्यांचे दागिने यावर १ टक्का कर आहे. ही तफावत सुसंगत वाटत नाही. या कारणास्तव नकली दागिने, काचेचे, प्लॅस्टिकचे किंवा मौल्यवान धातूंव्यतिरिक्त इतर धातूंचे मणी यावरील विक्रीकर ४ टक्के वरुन कमी करुन १ टक्का करण्याचे मी ठरविले आहे. मला खात्री आहे की राज्यातील तरुणी याचे स्वागत करतील.

इमारती लाकडावरील कर सवलतीस मुदतवाढ.

२६. इमारती लाकडाच्या विक्रीवर दिनांक १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीसाठी ४ टक्के असा सवलतीचा दर लागू होता. ही कर सवलत दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंत वाढवून देण्याबाबत मी प्रस्तावित करत आहे.

महसूल वृध्दीसाठी प्रस्ताव.

२७. माझ्या भाषणाच्या भाग- १ मध्ये दिलेल्या विविध योजनांची व्याप्ती, व त्याकरिता लागणारी तरतूद आणि वर उल्लेख केलेल्या कर सवलतींमुळे होणा-या महसूल हानीची काही प्रमाणात भरपाई करणे आवश्यक आहे, याबाबत सन्माननीय सदस्य माझ्याशी सहमत होतील. या अनुषंगाने मी काही वस्तूंच्या करवाढीचे प्रस्ताव सादर करीत आहे.

इलेक्ट्रॉनिक वस्तू.

२८. मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, व्हिडिओ फोन, व्हिडिओ कॅमेरे आणि डिजिटल कॅमेरे इत्यादी यावर सध्या ४ टक्के एवढा कर आहे. अनेक राज्यामध्ये या वस्तुंवर कराचा दर १२.५ टक्के आहे. त्यामुळे हा दर वाढवून १२.५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

जिप्सम बोर्ड. २९. जिप्सम बोर्डचा वापर मुख्यत्वेकरुन उच्च दर्जाचे बांधकाम व सजावटीसाठी होतो. काही न्यायनिवाडयांमुळे यावर ४ टक्के दराने कर लागतो. जिप्सम बोर्ड वरील कराचा दर ४ टक्के असणे अभिप्रेत नाही. यास्तव जिप्सम बोर्डचा कराचा दर ४ टक्के वरुन १२.५ टक्के करण्यात येत आहे.

दारुवरील विक्रीकर. ३०. भारतीय बनावटीची विदेशी दारु, देशी दारु, आयात केलेली दारु यावर सध्या विक्रीकराचा दर २० टक्के आहे. अनेक राज्यांमध्ये हा दर २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. वरील दारुच्या विक्रीवरील विक्रीकराचा दर २० टक्क्यांवरुन वाढवून २५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

तंबाखू व सिगारेट वरील कर. ३१. तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थ व सिगारेट या वस्तूंचे सेवन आरोग्यास घातक आहे. या वस्तूंच्या सेवनाचे प्रमाण कमी करण्याकरीता केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी कडक उपाय योजले आहेत. या उत्पादनांवरील कराचा दर वाढविल्यास या वस्तूंच्या सेवनास काही प्रमाणात आळा बसू शकतो. या कारणासाठी या उत्पादनावरील सध्याचा १२.५ टक्के कराचा दर वाढवून २० टक्के करण्याचे ठरविले आहे. परंतु, अनुत्पादित तंबाखू व विडी या वस्तू पूर्वीप्रमाणेच यापुढेही करमुक्त राहतील.

करारपत्रावरील मुद्रांक शुल्क संरचनेत बदल. ३२. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा करुन जाहिरात करारपत्र, चित्रपट प्रदर्शन हक्क, कॉपीराईटस् इत्यादी दस्तऐवजांसाठी कर आकारणीची फेररचना प्रस्तावित आहे. अशा दस्तऐवजांच्या सध्याच्या कमाल मर्यादेवरील कराराच्या रकमेसाठी सध्याच्या दुप्पट दराने कर लावण्याचे मी प्रस्तावित करतो.

तसेच, दोन कंपन्यांच्या विलिनीकरणाच्या दस्तऐवजांवरील करासाठी २५ कोटी रुपयांची कमाल मर्यादा आहे. ती कमाल मर्यादा रद्द करण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित करवाढीमुळे सामान्य जनतेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही आणि मोठ्या रकमांचे करारनामे करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांकडून शासनास वाढीव महसूल प्राप्त होईल.

उत्पादन शुल्काच्या रचनेत बदल.

३३. देशी व विदेश मद्यावरील कर रचनेमध्ये २००६ मध्ये काही बदल करण्यात आले होते. त्यामध्ये मी खालील प्रमाणे आणखी काही बदल सुचवित आहे.

(अ) भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य व देशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा सध्याचा प्रति प्रुफ लिटरसाठी १६० रुपये व ६० रुपये एवढा आहे.तो अनुक्रमे १८० रुपये प्रति प्रुफ लिटर व ६५ रुपये प्रति प्रुफ लिटर एवढा असेल.

(ब) विदेशी व देशी मद्याच्या किरकोळ विक्रीचा (M.R.P.) सध्याच्या दरानुसार निर्मिती मुल्याचा कट पॉइंट ९२ रुपये प्रति बल्क लिटर इतका होता. त्यामध्ये वाढ करुन तो १०० रुपये प्रति बल्क लिटर इतका असेल.

उत्पादन शुल्काचा व एम.आर.पी.चा फॅक्टर बदलणे.

३४. सध्या देशी व विदेशी मद्यावर निर्मिती मूल्य गुणिले २ या दराने उत्पादन शुल्क वसूल केले जाते. त्यामध्ये वाढ करुन ते निर्मिती मूल्य गुणिले २.२५ असे करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे देशी व विदेशी मद्याच्या सध्याच्या कमाल किरकोळ विक्रीच्या दराचे सूत्र निर्मिती मूल्य गुणिले ४ ऐवजी निर्मिती मूल्य गुणिले ४.५० असे राहील.

मुंबई मोटारवाहन कर अधिनियम, १९५८ चारचाकी वाहनांच्या किंमतीवर आधारित कर आकारणी.

३५. मुंबई मोटारवाहन कर अधिनियम, १९५८ च्या परिशिष्ट ३ मधील भाग-१ नुसार खाजगी चारचाकी वाहनांवर किंमतीच्या ७ टक्के दराने व कंपनीच्या मालकीच्या व परदेशातून आयात वाहनांवर सर्वसाधारण दराच्या दुप्पट कर आकारणी करण्यात येते.

त्यामुळे १० लाख रुपयापर्यंतच्या किंमतीच्या वाहनांवर तेवढाच म्हणजे ७ टक्के व १० लाख रुपयांपेक्षा जास्त परंतु २० लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या वाहनाला ८ टक्के आणि २० लाख रुपयांवरील किंमतीच्या वाहनांवर ९ टक्के अशी कर आकारणी प्रस्तावित आहे.

अर्थसंकल्पीय प्रस्ताव.

३६. माझ्या कर प्रस्तावांमुळे ९१० कोटी रुपयांची महसूलात वाढ होणे अपेक्षित आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**